**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.२८/०७/२०२६

वसई-विरार शहर महानगरपालिका
घनकचरा व्यवस्थापन विभाग

*__महानगरपालिकेमार्फत प्रतिबंधित प्लास्टिक जप्तीच्या कारवाईला वेग;__*
***२०९ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त***

वसई-विरार शहर महानगरपालिका मा. आयुक्त श्री. पृथ्वीराज बी. पी. (भा.प्र.से.) यांच्या आदेशानुसार तसेच मा.अतिरिक्त आयुक्त श्री. संजय हेरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिका क्षेत्रात प्रतिबंधित प्लास्टिकविरोधी विशेष मोहीम राबविण्यात आली असून या मोहिमेअंतर्गत आज दि. २८ जुलै २०२६ रोजी सर्व प्रभाग समिती कार्यालयांच्या माध्यमातून शहरातील विविध दुकाने, व्यावसायिक आस्थापना व व्यावसायिक परिसरांची तपासणी करून २०९ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात सर्व प्रभाग समिती कार्यालयांतर्गत प्रतिबंधित प्लास्टिक जप्तीच्या आज दि.२८ जुलै २०२६ रोजी झालेल्या कारवाईत एकूण २०९ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले तसेच संबंधितांवर महानगरपालिकेमार्फत दंडात्मक कारवाई करून रु.७८०००/- इतका दंड वसूल करण्यात आला. प्रभाग निहाय विविध ठिकाणी दुकाने व आस्थापनांवर तपासणी करून सदर कारवाई करण्यात आली. यामध्ये प्रभाग समिती 'ए' बोळींज अंतर्गत ४२ किलो, प्रभाग समिती 'बी' विरार अंतर्गत १७ किलो, प्रभाग समिती 'सी' चंदनसार अंतर्गत १७ किलो, प्रभाग समिती 'डी' आचोळे अंतर्गत १४ किलो, प्रभाग समिती 'ई' नालासोपारा अंतर्गत २२ किलो, प्रभाग समिती 'एफ' पेल्हार अंतर्गत ५० किलो, प्रभाग समिती 'जी' अंतर्गत १७ किलो, प्रभाग समिती 'एच' अंतर्गत ३० किलो असे एकूण २०९ किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले.

महानगरपालिकेकडून सातत्याने प्रतिबंधित प्लास्टिकच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी तपासणी मोहीम राबविण्यात येत असून ही कारवाई सुरूच राहणार असून प्लास्टिकमुक्त व स्वच्छ शहर निर्माण करण्यासाठी कठोर पावले उचलली जात आहेत. प्रतिबंधित प्लास्टिकमुळे पर्यावरण, जलस्रोत, सागरी जीवसृष्टी तसेच मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याने त्याचा वापर पूर्णतः टाळणे आवश्यक आहे. प्लास्टिक कचऱ्यामुळे नाले व गटारे तुंबून पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे अशा प्रकारच्या कारवाया पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या ठरत आहेत.

प्रतिबंधित प्लास्टिकचे उत्पादन, आयात, साठवण, वितरण विक्री, वापर करताना आढळल्यास नियमानुसार दंड व कारावासाची शिक्षाही होऊ शकते. यामुळे कोणत्याही व्यापाऱ्याने प्रतिबंधित प्लास्टिक खरेदी किंवा विक्री करून तसेच नागरिकांनीही प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर करून आपले शहर विद्रूप करू नये व पर्यावरणास हानी पोहोचेल अशी कोणतीही गोष्ट करू नये. तसेच पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करून शहर स्वच्छ, सुंदर व प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.